पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ७१**
(सभावृत्तांत)

**दिनांक – ११/०७/२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ११/०७/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
८. मा.गीता सुशिल मंचरकर
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी
१४. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.साळवे – अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.राऊत, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.पवार –प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके –

मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.देशमुख - कार्यकारी अभियंता, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.माने – पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२६) वास्तुविशारद नेमणूकी बाबत -मा.मोरेश्वर भोंडवे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२७) ठराव क्र.१८७ अन्वये प्रशासकिय मान्यता तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात करावयांच्या तरतुदीस मान्यता मिळणेबाबत – मा.विलास मेडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

विषय क्र.२८) उर्दु माध्यमिक शाळांसाठी १९ शिक्षकांची मानधनावर नेमणूक करणेबाबत – मा.राजेंद्र गावडे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२९) पेठ क्र.३२अ, खुली जागा क्र.१ ही जागा र.रू.१/- या नाममात्र दराने अधिमुल्य आकारणी करणेबाबत - मा.मोरेश्वर भोंडवे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३०) ई गटातील वाहन दुरूस्ती कामाच्या ठेक्यातील वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत

----------

**खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.**

सूचक – मा.राजेंद्र गावडे     अनुमोदक - मा.सागर आंगोळकर

दि.११/७/२०१८ ची मा.स्थायी समिती सभा बुधवार दिनांक १८/७/२०१८ रोजी दुपारी १.३० वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

--------

**मा.सभापती** - बुधवार दिनांक १८/७/२०१८ रोजी दुपारी १.३० वा. पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ७१**

(सभावृत्तांत)

**(दिनांक ११/०७/२०१८ ची तहकूब सभा)**

**दिनांक – १८/०७/२०१८** **वेळ – दुपारी १.३० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि. ११/७/२०१८ ची तहकूब सभा बुधवार, दिनांक १८/०७/२०१८ रोजी दुपारी १.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.गीता सुशिल मंचरकर
१०. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
११. मा.लांडगे सारिका संतोष
१२. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४. मा.बारणे अर्चना तानाजी
१५. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.झगडे, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.खोत, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत - सहाय्यक आयुक्त, मा.पवार

– प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्रथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.घुबे, मा.पवार, मा.सुपेकर, मा.देशमुख - कार्यकारी अभियंता, मा.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.दांगट– प्रशा.अधिकारी, मा.झनकर – लेखाधिकारी, मा.माने – पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक -२८६४ विषय क्रमांक - ०१
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/ड-मुख्य/१४५/२०१८ दि.२७/०६/२०१८

मा. अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.82/1/2017-18 अन्वये प्रभाग क्र.२६ मधील नाल्याची स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.एच.सी.कटारीया नि.र.रू.1,43,43,162/- (अक्षरी र.रु.एक कोटी त्रेचाळीस लाख त्रेचाळीस हजार एकशे बासष्ट फक्त) पेक्षा 2.5% कमी दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 8.36% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.1,39,84,583/- पर्यंत काम करून घेणेस त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८६५ विषय क्रमांक - ०२
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – ग क्षेत्रिय आरोग्य
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचे जा.क्र.गक्षेका/आ/४/कावि/३५७/२०१८ दि.०२/०७/२०१८

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.आयुक्त सो, यांचेकडील आदेश क्र.प्रशा२/कावि/४६०/२०१७ दि.०७/०८/२०१७ अन्वये प्रभाग समित्यांची पुर्नरचना झालेली आहे. त्यानुसार नविन प्रभाग रचनेनुसार ग क्षेत्रीय कार्यालय दि.०९/०८/२०१७ रोजी अस्तित्वात आले आहे. त्यानुसार ब क्षेत्रीय कार्यालयातील जुने प्रभाग क्र. ४९,५०,५१ यांचे वर्गीकरण ग क्षेत्रीय कार्यालयामधील नविन प्र.क्र.२३ व २४ यामध्ये त्यांचा समावेश झालेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ग क्षेत्रीय आरोग्य कार्यालयाच्या

कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक २१, २३, २४ व २७ मधील दैनंदिन घरोघरचा कचरा, कुंड्यामधील कचरा, सार्वजनिक ठिकाणी साठणारा कचरा, गटर्सच्या कडेचे कचरा ढिग, मोकळ्या जागेतील कचरा ढिग दैनंदिन उचलुन महानगरपालिकेच्या मोशी कचरा डेपो येथे टाकणेच्या कामासाठी ब क्षेत्रिय आरोग्य कार्यालयाकडील ठेकेदार मे जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगाव, पिंपरी यांना प्रति दिन प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१३०/- व भोसरी कचरा स्थानांतरण केंद्र येथे कचरा खाली करण्यासाठी प्रति दिन प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.४९००/- या दराने आदेश क्र. बक्षेआ/५/कावि/१००७/१६ दि.३१/१२/२०१६ नुसार देण्यात आलेले आहे. तरी ब क्षेत्रिय आरोग्य कार्यालयाकडील मे जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगाव, पिंपरी यांच्या आदेशाची मुदत दि.३१/१२/१७ रोजी संपुष्टात आलेली होती. सदर कामकाजास, ब क्षेत्रिय आरोग्य कार्यालयाकडील पत्र क्र. १) बक्षेआ/५/कावि/८१०/२०१७ दि.०८/१२/२०१७ व २) बक्षेआ/५/कावि/८३२/२०१७ दि. १६/१२/२०१७ नुसार कचरा उचलणे व वाहतुक करणेसाठी मे जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगाव, पिंपरी यांना ग क्षेत्रीय कार्यालयामार्फत कामकाजाची मुदतवाढ घेण्यात येऊन आपल्या स्तरावर कामकाज करण्यात यावे असे कळविलेले आहे. दि.०९/०८/२०१७ रोजी पासुन ६ क्षेत्रीय कार्यालया ऐवजी ०८ क्षेत्रीय कार्यालयाची निर्मिती झाल्याने ब क्षेत्रीय कार्यालयाकडील ०३ ट्रक/टिपर वाहने व ड क्षेत्रीय कार्यालयाकडील ०४ ट्रक/टिपर वाहने असे एकुण ०७ वाहने मे.जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरी यांच्या मार्फत पुरविण्यात आलेले आहे. मा.स्थायी समितीची सदर संस्थेच्या कामास व होणा-या खर्चास दि.१/१/१८ ते ३१/३/१८ व दुसरी मुदतवाढ ठराव क्र.२६३१ दि.०९/०५/२०१८ अन्वये दि.१/४/१८ ते ३०/६/१८ अखेर मान्यता घेण्यात आलेली आहे. तथापि कचरा उचलणे व वाहतुक करणे कामकाज हे अत्यावश्यक सेवेचे असून, मे. जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरी यांना या कामासाठी टिपर ट्रक ७.५ मे.टन क्षमता असणारे प्रति दिन, प्रति वाहनावर दोन खेपांसाठी एक वाहन चालक + चार मजूर + इंधनासह एकुण ०७ वाहने भाडे तत्वावर पुरविण्यासाठी दि.०१/०७/२०१८ ते ३१/१२/२०१८ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पूर्ण होईपर्यंत, यापैकी प्रथम येणा-या कालावधी पर्यतच्या कामकाजास मुदतवाढ देणेस तसेच सदर कामाचे अपेक्षीत अंदाजीत खर्च र.रु.६७,००,०००/- (अक्षरी र.रू. सदोसष्ट लाख फक्त) या येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८६६ विषय क्रमांक - ०३
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे जा.क्र.इक्षेका/नि-६/कावि/१४१/२०१८ दि.२८/०६/२०१८

मा.कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील(१ ते ३) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असून मंजूर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८६७ विषय क्रमांक - ०४
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – माध्यमिक शिक्षण विभाग
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शिक्षण/१/कावि/५७७/२०१८ दि.०२/०७/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.स्थायी समिती सदस्य पारीत ठरावानुसार मा.अति.आयुक्त सो यांनी र.रु.१२,०००/- ऐवजी र.रु.८०००/- बी.एड./बी.एस.सी. शिक्षकांना शिक्षण सेवकाप्रमाणे मानधन देण्याबाबत मान्यता दिलेली आहे. तरी एकत्रित मानधनावर ८ वी ते १० च्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी ५० शिक्षक आवश्यकता असलेने सदर शिक्षक नेमणुकीची जाहिरात व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८६८ विषय क्रमांक - ०५
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – लेखा विभाग
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/६/कावि/७६४८/२०१८ दि.३०/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कायदा सल्लागार(प्र) कायदा विभाग यांनी दि.१२/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये कायदा विभागाकडील सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता 'मनपा न्यायालय अस्थापना खर्च' या लेखाशिर्षावर र.रु ८०,००,०००/- इतकी तरतुद वार्षिक ज पत्रकात करण्यात आलेली आहे. तथापि, आकुर्डी न्यायालयाचे सन २०१७-२०१८ चे वार्षिक वेतन व भत्ते खर्चाची मागणी बील

र.रु.८०,९०,९२८/- इतके देय होत आहे. त्यामुळे सदरचे बिल अदायगीकामी उपलब्ध तरतुद अपुरी पडत आहे. या शिवाय पुणे न्यायालय येथील मनपा चेंबर नं.५२ चे देखभाल दुरुस्ती, वार्षिक वर्गणी व इतर खर्च यासाठी सदर लेखाशिर्षावर रक्कम शिल्लक ठेवणे आवश्यक आहे. त्यांनी "वाहन नुकसान भरपाई" लेखाशिर्षातून "मनपा न्यायालय आस्थापना"लेखाशिर्षावर र.रु.२,००,०००/-(अक्षरी र.रू. दोन लाख फक्त) विभागाअंतर्गत वर्गीकरण करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८६९ विषय क्रमांक - ०६
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – नगरसचिव विभाग
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नस/२/कावि/१६७/२०१८ दि.०२/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

अखिल भारतीय महापौर परिषदेची सन २०१८-२०१९ ची वार्षिक वर्गणी र.रू.२३,६००/- (अक्षरी र.रू.तेवीस हजार सहाशे फक्त) "All India Council of Mayors" या नावे धनादेशाद्वारे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८७० विषय क्रमांक - ०७
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार विभाग
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.सहा. आयुक्त यांचे जा.क्र.मभां/५/कावि/३९८/२०१८ दि.२९/०६/२०१८

मा.सहा. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे मा.पदाधिकारी व मा.अधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी उत्पादीत कंपनीचे मोबाईल संच साहित्य पुरवठा करणेकामी ई.नि.सुचना क्र.०५/२०१८-१९ अन्वये प्रसिध्द करून ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त दर पत्रकामध्ये मे.इंदु इन्फोटेक सोल्युशन, भोसरी, पुणे-३९ यांचे मोबाईल संच एकूण २५ नग साहित्यासाठी र.रु.४,९६,१२५/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदर मोबाईल संच साहित्य १ वर्षाचे कालावधीत मनपाचे आवश्यकतेनुसार किंवा टप्याटप्याने पुरवठा करणे आवश्यक आहे. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा ०.०५% ने कमी आहे. मे.इंदु इन्फोटेक सोल्युशन, भोसरी, पुणे-३९ यांचे आवश्यक सॅमसंग मोबाईल संच साहित्य खरेदी

करणेकामी एकूण र.रु.४,९६,१२५/- (अक्षरी र.रू.चार लाख शहाण्णव हजार एकशे पंचवीस फक्त) दर स्विकृत करून करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८७१ विषय क्रमांक - ०८
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – जलनि:सारण विभाग
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/१०८१/२०१८ दि.०४/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.32-1-2017-2018 अन्वये पिंपरी चिंचवड मनपाच्या "ग" प्रभागातील जलनिःसारण नलिकांची यांत्रिकी पध्दतीने वार्षिक साफसफाई करणे व चोकअप काढणेकामी M/s VISHAL CIVIL CONTRATOR यांनी नि.र.रू.98,93,100/- (अक्षरी र.रू. अठयाण्णव लाख त्र्याण्णव हजार शंभर फक्त) पेक्षा 2.00% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने रक्कम रूपये 96,95,238/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा /वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८७२ विषय क्रमांक - ०९
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – जलनि:सारण विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/१०७८/२०१८ दि.०४/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.30/4/2017-18 अन्वये आकुर्डी मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत सल्लागार यांनी सुचविल्या प्रमाणे दत्तवाडी, विठ्ठलवाडी, विवेकनगर, इ. भागात जलनि:सारण सुधारणा विषयक कामे करणेकामी M/s. CHOTELAL CHAUHAN यांनी नि.र.रू.59,99,990/- (अक्षरी र.रू.एकोणसाठ लाख नव्याण्णव हजार नऊशे नव्वद फक्त) पेक्षा 28.00% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने रक्कम रूपये 43,19,993/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार

मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८७३ विषय क्रमांक - १०

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – जलनि:सारण विभाग

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/१०७९/२०१८ दि.०४/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.33-1-2017-2018 अन्वये इ प्रभागातील जुन्या मलवाहिन्यांमध्ये सुधारणा विषयक कामे करणेकामी M/s Shubham Udyog यांनी नि.र.रू.74,99,020/- (अक्षरी र.रू.चौ-याहत्तर लाख नव्याण्णव हजार वीस फक्त) पेक्षा 22.50% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने रक्कम रूपये 58,11,741/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरा नुसार फरकाची रक्कम अदा /वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८७४ विषय क्रमांक - ११

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – जलनि:सारण विभाग

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/१०८०/२०१८ दि.०४/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.33-2-2017-2018 अन्वये क क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत येणा-या झोपडपट्टयांमध्ये मलनि:सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकामी M/s Shubham Udyog यांनी नि.र.रू.74,99,962/- (अक्षरी र.रू.चौ-याहत्तर लाख नव्याण्णव हजार नऊशे बासष्ठ फक्त) पेक्षा 16.20% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने रक्कम रूपये 62,84,968/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस

अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८७५ विषय क्रमांक - १२
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग–ग क्षेत्रीय, जलनि:सारण विभाग
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.गक्षे/जनि/ग/अ५/१७/२०१८ दि.०३/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रायोगिग तत्वावर थेरगाव मधील यांत्रिकी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबर मधील गाळ काढणे व साफसफाई करणेकामी अशा प्रकारच्या कामांसाठी एकत्रित जेटींग, ग्रॅब व रॉडिंग यंत्रणा असलेले वाहन/ मशीन असलेले एकमेव व महानगरपालिकेकडे यापूर्वी कामाचा अनुभव असलेल्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून काम करणेसाठी ठेकेदाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम अनुसूची ड प्रकरण ५/२(२) परंतुक ७३क व ड अन्वये स्थायी समितीला, तिच्या कार्यवृत्तात कारणे नमूद करून, आयुक्तास, यात तरतूद केल्याप्रमाणे निविदा न मागविता किंवा मागवल्यानंतर त्यांचेकडे ज्या कोणत्याही निविदा येतील त्या न स्वीकारता संविदा करण्यास प्राधिकृत करता येईल त्यानुसार ठेकेदार यांनी थेट पध्दतीने काम देता येणे शक्य आहे. कामाची तातडी विचारता घेता निविदा न मागविता करारनामा करून सदरचे काम करून घेणे आवश्यक आहे. तथापि, उक्त अधिनियमान्वये मा. स्थायी समितीची पुर्व मान्यता घेणे अत्यावश्यक आहे. KAMJET-GR या मशीनवर जेटींग, ग्रॅब व रॉडिंग मशीन एकत्रित असलेल्या वाहनाद्वारे प्रति महिना किमान ४५० मी. लांब मलनिस्सारण नलिका साफ करणे व १५० मॅनहोल चेंबर्स साफ करणेचे काम करणे शक्य आहे. सध्या चालू असलेल्या प्रचलित दरानुसार प्रतिमहा ४५० मी. लांब १५० ते २५० मि.मी. व्यासाची मलनिस्सारण नलिकेस र.रु.२७६/- प्रति मीटर या दराने साफ करण्यास र.रु.१,२४,२००/- (अक्षरी र.रु.एक लाख चौवीस हजार दोनशे फक्त) तसेच प्रति महा किमान १५० मॅनहोल चेंबर्स र.रु.१३११/- चेंबर्स या महानगरपालिकेच्या मंजूर दराने साफसफाई करण्यास र.रु.१,९६,६५०/- (अक्षरी र.रु. एक लाख शहान्नव हजार सहाशे पन्नास फक्त) असे एकत्रित र.रु.३,२०,८५०/- (अक्षरी र.रु.तीन लाख वीस हजार आठशे पन्नास फक्त) खर्च अपेक्षित आहे. अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.५०% कमी या दराने प्रतिमहा र.रु.३,०३,२०३/-(अक्षरी र.रु. तीन लाख तीन हजार दोनशे तीन फक्त) खर्च अपेक्षित आहे. तथापि र.रु.२,९०,०००/-(अक्षरी र.रु.दोन लाख नव्वद हजार फक्त) प्रति महा ठेकेदार मे.काम-अविदा एन्व्ह्यारो इंजिनिअर्स प्रा. लि. हे काम करण्यास तयार असल्याबाबत दिनांक २८/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. सदरचा दर प्रचलित दरापेक्षा कमी असल्याने ठेकेदार मे.काम-अविदा एन्व्ह्यारो इंजिनिअर्स प्रा. लि. यांस

पावसाळ्याच्या किमान ३ महिने कालावधीसाठी प्रतिमहा र.रु.२,९०,०००/- असे एकूण र.रु.८,७०,०००/- (अक्षरी र.रु. आठ लाख सत्तर हजार फक्त) या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८७६ विषय क्रमांक - १३

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/क-मुख्य/१२७/२०१८ दि.०७/०७/२०१८

विषय - मौजे भोसरी कासारवाडी येथील आरक्षण क्र.१३ विकसित करणे.

विषय क्र.१३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८७७ विषय क्रमांक - १४

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – पाणीपुरवठा विभाग

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/६/कावि/१८/२०१८ दि.०५/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.२६/६/२०१७-१८ अन्वये इ प्रभागातील विविध टाक्यावरून पाणीपुरवठा करणेसाठी मजुर पुरविणेकामी (सन २०१७-१८) मे.शुभम उद्योग निविदा रक्कम रू.१,११,४६,६७४/- (अक्षरी र.रू.एक कोटी अकरा लाख शेहचाळीस हजार सहाशे चौ-याहत्तर फक्त) पेक्षा १३.६७% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.९६,२२,९२३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८७८ विषय क्रमांक - १५

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – उद्यान विभाग

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/४/कावि/३६५/२०१८ दि.०५/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

म.न.पा वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.५-/२०१८-१९ मधील मिलीटरी हद्दीतील एच.क्यु.३३० इन्फन्ट्रि ब्रीगेड औंध कॅम्प येथे मोठी रोपे पुरविणे व लागवड करून ३ वर्षे देखभाल करणेकामी मे.न्यु गार्डन गुरूज फार्म अँन्ड नर्सरी निविदा र.रू.२,५८,४१,०००/- (अक्षरी र.रू.दोन कोटी अठ्ठावण्ण लाख एक्केचाळीस हजार फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३.७१% ने कमी दराची निविदा स्वीकृत करणेत आली असून त्याप्रमाणे येणारा खर्च र.रू.२,४८,८२,२९९/- चे खर्चास मान्यता तसेच त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८७९ विषय क्रमांक - १६

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/फ-मुख्य/कावि/३२५/१८ दि.०५/०७/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते १७) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८८० विषय क्रमांक - १७
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे जा.क्र.स्था/नि/ब-मुख्य/३८३/१८ दि.०६/०७/२०१८

मा. अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.112/3/2017-18 अन्वये प्र.क्र.१९ वाल्हेकरवाडीतील चिंतामणी गणेश मंदीर, आहेरनगर, रजनीगंधा हौ.सोसा. शिवाजीपार्क इ. परीसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.धनेश्वर कंन्स्ट्रक्शन नि.र.रू.79,86,469/- (अक्षरी र.रु.एकोणऐंशी लाख शह्याऐंशी हजार चारशे एकोणसत्तर फक्त) पेक्षा 13.25% कमी र.रू.69,28,262/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८८१ विषय क्रमांक - १८
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.सहा.आयुक्त (भांडार) यांचे जा.क्र.YCMH/भांडार/२/कावि/३१५/१८ दि.०४/०७/२०१८

मा.सहा.आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या नेत्ररोग विभागाचे विभागप्रमुख यांनी मागणी केलेनुसार, नेत्ररोग-ओटी विभागातील Optikon Phaco Machine Model P2MS उपकरणाचे AMC करणेकामी संबंधित कंपनीचे अधिकृत सर्व्हिस प्रोव्हायडर मे.टेक्नो हॅण्ड सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई यांनी सादर केलेले एकूण र.रु.५७,८६५/-(अक्षरी र.रू.सत्तावन्न हजार आठशे पासष्ट फक्त) चे दरपत्रक स्विकृत करणेत आले आहे. त्याकामी कंपनीने करारनामा करुन दिला असुन AMC चा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८८२ विषय क्रमांक - १९
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – लेखा विभाग
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/३/कावि/१७७/१८ दि.०६/०७/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०१८ १९ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.१६४.५६ कोटी (अक्षरी र.रु.एकशे चौसष्ट कोटी छपन्न लाख) फक्त तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट ८१.५६ कोटी विविध प्रकारचे पासेस र.रु.२३/- कोटी व बसेस खरेदी र.रु.६०/- कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून जुलै २०१८ ची रक्कम रुपये ६ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेसपोटी र.रु.१.५० कोटी असे एकूण र.रु.७.५० कोटी (अक्षरी र.रु. सात कोटी पन्नास लाख) फक्त याप्रमाणे माहे जुलै २०१८ अखेर ०१ महिन्याची अग्रीम स्वरुपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८८३ विषय क्रमांक - २०
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – स्थापत्य विभाग
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/उद्यान/कावि/२४७/१८ दि.०६/०७/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.७६/०२/२०१७-१८ मधील काम क्र.१ अन्वये, प्रभाग क्र.५ मधील जाधववाडी येथील आरक्षण क्र.१-१४७ येथील उद्यानाचे उर्वरित कामे करणेकामी मे.कुबेरा एंटरप्रायजेस निवीदा र.रु १,८६,४७,१६०/-(अक्षरी र.रू.एक कोटी, शहाऐंशी लाख, सत्तेचाळीस हजार, एकशे साठ फक्त) पेक्षा २०.२०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,४८,८०,४३४/- पर्यत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८८४ विषय क्रमांक - २१
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – विद्युत/यांत्रिकी विभाग
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे जा.क्र.मुका/५/कावि/२११/२०१८ दि.०४/०६/२०१८

मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र अ (१ ते ३) मधिल निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८८५ विषय क्रमांक - २२
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग –माहिती व जनसंपर्क विभाग
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माजसं/४/कावि/१६२/२०१८ दि.०६/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार प्रबोधन पर्वा निमित्त दि.२५/०६/२०१८ ते दि.२६/०६/२०१८ रोजी २ दिवस साई उद्यान, संभाजीनगर, चिंचवड या ठिकाणी प्रबोधनपर व्याख्यान, विद्यार्थ्यांसाठी करीयर मार्गदर्शन व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमाअंतर्गत आयोजित कार्यक्रमामधील कलाकारांचे मानधन, इ. खर्चाकरिता थेट पध्दतीने र.रु.१,२५,०००/-(अक्षरी र.रु.एक लाख पंचवीस हजार फक्त) प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८८६ विषय क्रमांक - २३
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – फ क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे जा.क्र.फक्षेका/नि-४/कावि/३१२/२०१८ दि.०४/०७/२०१८

मा.कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (1 ते 3) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून

कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८८७ विषय क्रमांक - २४

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.वाकास डोळस

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे जा.क्र.वायसीएमएच/७/कावि/३१४/२०१८ दि.२५/०५/२०१८

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात विविध पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईट जाहिरात प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांच्या लेखीपरीक्षा घेऊन त्यामधून गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांची निवड/प्रतिक्षा यादी प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये सादर केली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८८८ विषय क्रमांक - २५

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.विमुका/५/कावि/२६१/२०१८ दि.०७/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निविदा नो.क्र.31-2017/18 मधील अ.क्र.1 अन्वये मनपा नगरसदस्य, अधिकारी, कर्मचारी व विविध कार्यालयांना मोबाईल सिम सुविधा पुरविणेकामी वोडाफोन मोबाईल सर्व्हीस लि. नि.र.रू.1,25,00,000/- (अक्षरी र.रू.एक कोटी पंचवीस लाख फक्त) दर 28.50% कमी या ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहुन ठेकेदाराबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -२८८९ विषय क्रमांक - २६
दिनांक – १८/०७/२०१८
सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.मोरेश्वर भोंडवे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव –

रावेत येथील से.नं.३२३अ येथील मनपा उद्यानाच्या कामासाठी मनपा पॅनलवरील शिल्पी आर्किटेक्ट अँन्ड प्लॅनर यांना वास्तुविशारद म्हणुन नेमणेस व त्याकामी मनपा नियमाप्रमाणे फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८९० विषय क्रमांक - २७
दिनांक – १८/०७/२०१८
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव -

मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/बक्षेका/१/कावि/३९८/२०१८ दि.१७/४/२०१८ अनुसरून मा.महापालिका सभा दि.२०/४/२०१८ मध्ये विषय क्र.१५ अन्वये खालील कामांना ठराव क्र.१८७ अन्वये प्रशासकिय मान्यता तसेच सन २०१८-१९ च्या आर्थिक वर्षात करावयांचया तरतुदीस मान्यता मिळाली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | करावयाची तरतुद |
|---|---|---|---|
| १. | वाकड वार्ड क्र.५३ स.नं.२०८ वाकड कावेरीनगर येथे २५ ल.लि. क्षमतेची पाण्याची उंच टाकी व संपवेल आणि सिमाभिंत बांधणे. | ५,५०,००,०००/- | १,००.००.०००/- |
| २. | थेरगाव, लक्ष्मणनगर येथील जुनी पाण्याची टाकी पाडून नविन २५ लक्ष क्षमतेची पाण्याची उंच टाकी बांधणे. | २,५०,००,०००/- | १,००,००,०००/- |

तरी मा.महापालिका सभेने मंजुर केलेला सदर ठराव क्र.१८७ चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८९१ विषय क्रमांक - २८

दिनांक – १८/०७/२०१८

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव -

महापालिकेच्या उर्दु माध्यमिक शाळांसाठी १९ शिक्षकांची आवश्यकता आहे ते मानधनावर भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८९२ विषय क्रमांक - २९

दिनांक – १८/०७/२०१८

सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.मोरेश्वर भोंडवे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या पेठ क्र.३२अ, खुली जागा क्र.१ ची मागणी प्राधिकरणाकडे मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे कडील पत्र क्र.अप्र/स्था/१५५/२०१६ दि.२९/२/२०१६ अन्वये करणेत आली होती त्यास अनुसरून मुख्य कार्यकारी अधिकारी पिंपरी चिंचवड नवनगर विकासप्राधिकरण यांनी त्यांचे दि.१८/६/२०१८ रोजीचे पत्रात नमुद केलेल्या १ ते ९ अटी व शर्तीसह पेठ क्र.३२अ, खुली जागा क्र.१ ही जागा र.रू.१/- या नाममात्र दराने अधिमुल्य आकारणी करून मनपास देता येईल असे कळविले आहे. तरी सदर जागेचे क्षेत्रफळ १२५५८.७६९ चौ.मी. इतकी असुन त्यापोटी र.रू.१/- या नाममात्र दराने अधिमुल्य प्राधिकरणाकडे जमा करणे आवश्यक आहे. तरी सदरची रक्कम प्राधिकरणाकडे जमा करण्यासाठी तसेच त्यासाठी करावयाच्या भाडेपट्टी पोटी येणा-या खर्चास (उदा.मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, वकील फी, झेरॉक्स इ.) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८९३ विषय क्रमांक - ३०
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – वाहन दुरूस्ती कार्यशाळा
सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे जा.क्र.काशा/१/कावि/५६०/२०१८ दि.०३/०७/२०१८

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यशाळा विभागामार्फत गटवार पध्दतीने निविदा कार्यवाही करुन एजन्सी निश्चित करुन वाहन दुरुस्तीची कामे करुन घेण्यात येतात.त्या अंतर्गत देण्यात आलेल्या वाहन दुरुस्ती कामाच्या ठेक्याच्या कालावधीत वाहन दुरुस्तीचे कामे मंजूर निविदा रक्कमे पेक्षा जादा होणा-या र.रु.६०,००,०००/-(अक्षरी र.रू.साठ लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/९२४/२०१८
दिनांक - १९/०७/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.इक्षेका/नि-६/कावि/१४१/२०१८, दि.२८/०६/२०१८ विषय क्र.३ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, इ क्षेत्रीय कार्यालय, निगडी -44

(विषयपत्र क्र.इक्षेका/नि-6/कावि/141/2018 दि.28/06/2018 लगत)

प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर. | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.बारणे कन्स्ट्रक्शन | 2/14-2017-2018 | प्रभाग क्र ६ मोशी येथील विविध ठिकाणी बोर्ड बेंचेस व रोड फर्निचर चे काम करणे | 7/3/2018 | इक्षेका/नि-6/कावि/119/2018 | 24/4/2018 | 898727 | 35.99% कमी | 575275 |
| 2 | मे सदगुरुकृपा कन्स्ट्रक्शन | 2/18-2017-2018 | प्रभाग क्र. ३२ सॅडविक कॉलनी (नवीन प्र.क्र.५ ) मध्ये विविध ठिकाणचे डांबरी रस्ते दुरुस्ती करणे | 7/3/2018 | इक्षेका/नि-6/कावि/130/2018 | 5/6/2018 | 932193 | 1.20% कमी | 921007 |
| 3 | मे. मोहनलाल मथराणी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | 2/20-2017-2018 | प्रभाग क्र. ६ मोशी येथील रस्त्यांची दुरुस्ती डांबरीकरणाने करणे | 7/3/2018 | इक्षेका/नि-6/कावि/116/2018 | 21/4/2018 | 932812 | 3.45% कमी | 900630 |
| | | | | | | | | | 2396912 |

कार्यकारी अभियंता(स्थापत्य)
इ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी , पुणे 411 039

(क्र.स्था/नि/फ-मुख्य/३२५/२०१८, दि.०५/०७/२०१८ विषय क्र.१६ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य मुख्यालय
क्र.स्था/नि/फ-मुख्य/३२५/२०१८
दि.५ /७/२०१८

प्रपत्र अ ( १ ते १७ )

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | | १० |
| १ | यश कन्स्ट्रक्शन | ७३/१३/२०१७-१८ | प्रभाग क्र.६० सांगवी ममतानगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | २२/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२८१/२०१८ | २३/०५/१८ | ११,१७,०७५ | १३.३५ | %कमी | ९६७९४५ |
| २ | एस एस कन्स्ट्रक्शन एस एस सुर्वे | ७३/४१/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील ढोरेनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | २२/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२८२/२०१८ | २३/०५/१८ | ११,१७,३१५ | १०.०० | %कमी | १००५५८४ |
| ३ | एस एस कन्स्ट्रक्शन एस एस सुर्वे | ७३/४०/२०१७-१८ | सन २०१७-१८ साठी प्रभाग क्र.५९ येथील क्रिडा विषयक किरकोळ दुरुस्तीची वप देखभालीची कामे करणे. | २२/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२८३/२०१८ | २३/०५/१८ | १६,७९,४९१ | १०.०० | %कमी | १५११५४२ |
| ४ | एस एस कन्स्ट्रक्शन एस एस सुर्वे | ७३/४२/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील मधुबन भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | २२/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२८४/२०१८ | २३/०५/१८ | ११,१६,९३८ | १०.०० | %कमी | १००५२४४ |
| ५ | एस एस कन्स्ट्रक्शन एस एस सुर्वे | ७३/३६/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील ढोरेनगर भागामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे. | २२/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२८५/२०१८ | २३/०५/१८ | ११,१३,८२४ | १०.०० | %कमी | १००२४४२ |
| ६ | सिध्देश्वर एंटरप्रायजेस | ७३/५३/२०१७-१८ | प्रभाग क्र.६० सांगवी संगमनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | २२/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२८६/२०१८ | २३/०५/१८ | ११,१५,२०१ | १०.०० | %कमी | १००३६८१ |
| ७ | सिध्देश्वर एंटरप्रायजेस | ७३/०२/२०१७-१८ | प्रभाग क्र.६० सांगवी प्रियदर्शनी नगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | २२/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२८७/२०१८ | २३/०५/१८ | ११,१६,२५३ | १०.०० | %कमी | १००४६२८ |
| ८ | सुजित पद्माकर मते | ७३/०८/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील गंगानगर भागामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे. | २५/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२९०/२०१८ | २८/०५/१८ | ११,१३,५६८ | ९.०० | %कमी | १०१३३४७ |
| ९ | चैताली सप्लायर्स | ७३/३८/२०१७-१८ | प्रभाग क्र.६ मोशी येथील चौक सुधारणा व वाहतूक विषयक कामे करणे. | ०५/०६/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२९८/२०१८ | ०५/०६/१८ | २४,१४,२६६ | ३२.१० | %कमी | १६३९२८७ |

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | चैताली सप्लायर्स | ७२/०६/२०१७-१८ | प्रभाग क्र. १० मध्ये सांस्कृतिक केंद्र करणे - आकुर्डी स.नं. १८० मनपाच्या जागेस सिमाभिंत बांधणे. | ०५/०६/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२९९/२०१८ | ०७/०६/१८ | २२,८६,६२६ | २३.५० | %कमी | १७४९२६९ |
| ११ | एस.एस.साठे | ७३/५०/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील आनंदनगर भागामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे. | ०४/०६/१८ | स्था/नि/फ-मुख्य/३०४/२०१८ | १४/०६/१८ | ११,१४,१०५ | १०.१० | %कमी | १००१५८० |
| १२ | शिवगंगा कन्स्ट्रक्शन | १०३/६/२०१७-१८ | सन २०१७-१८ साठी प्रभाग क्र. ६१ मध्ये मुख्यालय स्तरावर किरकोळ दुरुस्तीची व देखभालची कामे करणे. | ११/०६/१८ | स्था/नि/फ-मुख्य/३०७/२०१८ | २०/०६/१८ | २१,००,००० | २८.०० | %कमी | १५१२००० |
| १३ | मंगल इंडस्ट्रीज | १०३/२/२०१७-१८ | प्रभाग क्र.६० सांगवी गावठाण परिसरामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | २८/०६/१८ | स्था/नि/फ--मुख्य/३१७/२०१८ | ०३/०७/१८ | ११,१४,३११ | २७.२७ | %कमी | ८१०४३८ |
| १४ | महालक्ष्मी एंटरप्रायजेस श तु इटकर | ७३/०६/२०१७-१८ | प्रभाग क्र. ६१ दापोडी पिंपळेगुरव रस्त्याच्या कडेला गटरवर आर.सी.सी. स्लॅब टाकणे चेकर्स टाईल्स बसविणे. | ११/०६/१८ | स्था/नि/फ-मुख्य/३१८/२०१८ | ०३/०७/१८ | १२,००,००० | १४.१० | %कमी | १०३०८०० |
| १५ | मंगल इंडस्ट्रीज | १०३/१/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील सातपुडा सोसायटीमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे. | २८/०६/१८ | स्था/नि/फ-मुख्य/३१९/२०१८ | ०३/०७/१८ | ११,१२,४७३ | २४.३० | %कमी | ८४२१४२ |
| १६ | मंगल इंडस्ट्रीज | १०३/५/२०१७-१८ | सन २०१७-१८ साठी प्रभाग क्र.६० येथील क्रिडा विषयक किरकोळ दुरुस्तीची व देखभालीची कामे करणे. | २८/०६/१८ | स्था/नि/फ-मुख्य/३२०/२०१८ | ०३/०७/१८ | १६,७५,०८७ | १८.२७ | %कमी | १३६९०४९ |
| १७ | मंगल इंडस्ट्रीज | १०३/३/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील मधुबन भागामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे. | २८/०६/१८ | स्था/नि/फ-मुख्य/३२१/२०१८ | ०३/०७/१८ | ११,१२,५५४ | २७.३६ | %कमी | ८०८१५९ |
| | | | एकुण र.रु. | | | | २,३६,१९,०८७ | | | १,९२,७७,१३७ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

(क्र.मुका/५/कावि/२११/२०१८, दि.०४/०६/२०१८ विषय क्र.२१ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी१८
विद्युत विभाग
प्रपत्र - अ

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाच्या आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. एन.सी.वाय एन्टरप्रायजेस | 10/22-2017-18 | सन 2017-18 करिता फ क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील कारंजे व धबधबे यासंचे वार्षिक पध्दतीने चालन व देखभाल दुरुस्ती करणे | 9/3/2018 | विमुका/5/कावि/ 196/2018 | दि. 19.4.2018 | 750000 | 2.02 % कमी | 734850 |
| 2 | मे. सनसाईन इले. | 17/4-2017-18 | इ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत गरीब शहरी वस्तीतील दिवाबत्तीचे एल.ई.डी. दिवे बसवुन नुतनीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे 2017-18 | 9/3/2018 | विमुका/5/कावि/ 198/2018 | दि. 19.4.2018 | 643625 | 10.52 % कमी | 575916 |
| 3 | मे. सनसाईन इले. | 17/30-2017-18 | दिघी उपविभागातील प्र.क्र.31 (नविन प्र.क्र.4) येथील अंतर्गत रस्त्यांवर आवश्यकतेनुसार प्रकाश व्यवस्था करणे | 9/3/2018 | विमुका/5/कावि/ 199/2018 | दि. 19.4.2018 | 680381 | 12.12 % कमी | 597919 |
| | | | | | | Total | 2074006 | | 1908684 |

सहशहर अभियंता(वि/यां)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

(क्र.फक्षेका/नि-४/कावि/३१२/२०१८, दि.०४/०७/२०१८ विषय क्र.२३ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी -44
(विषयपत्र क्र.फक्षेका/नि-4/कावि/ /2018 दि. /07/2018 लगत)

प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.श्री दत्तनाथ इलेक्ट्रीक वर्क्स | 6/1/2017-18 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत निगडी गावठाण उप विभाग मधील स्ट्रिट लाईट पोल वरील खराब नादुरूस्त जक्शंन बॉक्स बदलणे.सन २०१७ - १८ | 23/05/2018 | फक्षेका/नि-4/कावि/293/2018 | 4/06/2018 | 299740 | -15.00 % कमी | 254779 |
| 2 | मे.पार्वती इलेक्ट्रीक एंटरप्रायजेस | 6/2/2017-18 | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत संभाजीनगर उपविभागामधील दिवाबत्ती व्यवस्थेमधील खांबांची रंगरंगोटी ( पेंटिंग) करणे. सन२०१७-१८ | 13/06/2018 | फक्षेका/नि-4/कावि/298/2018 | 14/06/2018 | 299165 | -11.55 % कमी | 264611 |
| 3 | मे.व्ही.पी.जी. इलेक्ट्रीकल्स प्रा. लि. | 6/4/2017-18 | फ क्षेत्रीय कार्यालय अतर्गत चिखली तळवडे उप विभाग मधील सिग्नलची देखभाल दुरुस्ती करणे.सन २०१७ - १८ | 25/06/2018 | फक्षेका/नि-4/कावि/308/2018 | 4/07/2018 | 449565 | -5.00 % कमी | 427087 |
| | | | | | | एकुण | 1048470 | | 946477 |

कार्यकारी अभियंता(विद्युत)
फ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

(क्र.वायसीएमएच/७/कावि/३१४/२०१८, दि.२५/०५/२०१८ विषय क्र.२४ चे लगत)

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिपंरी-१८
## यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

**तात्पुरत्या स्वरुपात ६ महिनेकरीता दि. २४/०५/२०१८ ते दि. २३/११/२०१८ या कालावधीकरीता**

**मानधनावर नेमणुक करावयाची पॅरामेडीकल उमेदवारांची निवड व ~~प्रतिक्षा~~ यादी**

प्रपत्र 'अ' आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/३१३/२०१८ दि.२४/०५/२०१८

| अ.क्र. | नियुक्त उमेदवाराचे नाव | पदनाम | जात व प्रवर्ग | निवड | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरीफ मोहम्मद इसाक शेख | ब्लड बँक टेक्निशियन | खुला | खुला निवड 1 | २०,१००/- |
| २ | शिवांजली भंडारे | ब्लड बँक टेक्निशियन | अनु. जाती | खुला निवड 2 | २०,१००/- |
| ३ | सुनिल तुकाराम मांग | ब्लड बँक टेक्निशियन | अनु. जाती | अनु. जाती निवड 1 | १८,१००/- |
| ४ | प्रियदर्शन गायकवाड | ब्लड बँक टेक्निशियन | अनु. जमाती | अनु. जमाती निवड 1 | २०,१००/- |
| ५ | भाग्यश्री रामदास डांगोरे | ब्लड बँक कौन्सिलर | खुला | खुला निवड-१ | १७,१००/- |
| ६ | वर्षा लक्ष्मण भोसले | एम.एस.डब्ल्यु. | ( एस.सी. ) खुला | खुला निवड - 1 | १७,१००/- |
| ७ | किशन गणपती गायकवाड | एम.एस.डब्ल्यु. | एस.सी. | एस. सी. निवड - 1 | १७,१००/- |
| ८ | वैभव कारभारी जारकड | डाटा एन्ट्री ऑपरेटर | खुला | खुला निवड 1 | १७,१००/- |
| ९ | राहुल आनंदा बावस्कर | डाटा एन्ट्री ऑपरेटर | अनु. जाती | अनु. जाती निवड १ | १७,१००/- |
| १० | पठाण रसुल | डायलेसिस टेक्निशियन | खुला | खुला निवड 1 | १७,१००/- |
| ११ | उदय शिवणे | डायलेसिस टेक्निशियन | खुला | खुला निवड 2 | १७,१००/- |
| १२ | खंडागळे अमोल | डायलेसिस टेक्निशियन | एस.सी. | एस.सी. निवड 1 | १७,१००/- |
| १३ | महेश रमेश सुडके | फार्मासिस्ट | खुला | खुला निवड-१ | १७,१००/- |
| १४ | पुनम लोहार | फार्मासिस्ट | खुला | खुला निवड-२ | १७,१००/- |
| १५ | संदिप अंभग | फार्मासिस्ट | खुला | खुला निवड-३ | १७,१००/- |
| १६ | जाधव प्रिती सुरेश | फार्मासिस्ट | एस.सी. | नु.जाती (एस.सी) निवड- | १७,१००/- |
| १७ | राजश्री भागीत | फार्मासिस्ट | एस.टी. | नु.जमाती (एस.टी) निवड- | १७,१००/- |
| १८ | अविनाश अशोक मसने | एक्स रे टेक्निशियन | खुला | खुला निवड-१ | १७,१००/- |
| १९ | प्राजक्ता प्रकाश भोर्डे | एक्स रे टेक्निशियन | खुला | खुला निवड-२ | १७,१००/- |
| २० | रोशनी मोहन राठोड | एक्स रे टेक्निशियन | व्हि.जे.ए. | खुला निवड-३ | १७,१००/- |
| २१ | कांतिलाल बिडया तडवी | एक्स रे टेक्निशियन | एस.टी. | एस.टी.निवड-१ | १७,१००/- |
| २२ | तुकाराम जगन्नाथ पवार | एक्स रे टेक्निशियन | व्हि.जे.ए. | व्हि.जे.ए. निवड-१ | १७,१००/- |
| २३ | पांगारे पुजा ए. | लॅब टेक्निशियन | खुला | खुला निवड 1 | १८,१००/- |
| २४ | श्रुती आर. गोसावी | लॅब टेक्निशियन | खुला | खुला निवड 2 | १८,१००/- |
| २५ | प्रविन आर. हिंगणे | लॅब टेक्निशियन | खुला | खुला निवड 3 | १८,१००/- |

वैद्यकिय अधिक्षक
यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८